**नि.फौ.ख.क्र. ४३/२००८**

शासन वि. रफिक इमानदार.

**नि.क्र.९३**

**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०६</u>**

मी शपथेवर खरे कथन करतो की,

**नाव : किरण चंपालाल मुथा,**
वय : ६३ वर्षे, व्यवसायः व्यापार,
रा. शनिवार पेठ, कराड, ता. कराड, जि.सातारा.

**<u>सरतपासणी – सरकारी वकील श्रीमती एन.एस.अहिवळे यांचे मार्फत–</u>**

१. सन २००७ साली मी राजेंद्र सुरी पतसंस्थेत चेअरमन म्हणुन कार्यरत होतो. मी मासिक बैठकीमध्ये कर्ज प्रकरणे मंजुर करीत होतो. कर्ज मंजूर करतेवेळी आम्ही दाखल प्रकरणांमधील कागदपत्रांची तपासणी करीत होतो. प्रकरणामध्ये दाखल मिळकतींच्या महसुल पत्रकांची पाहणी करुन कर्ज प्रकरण मंजूर करीत होतो. मी संबंधित पतसंस्थेचा चेअरमन असताना प्रस्तुत प्रकरणांतील आरोपी क्र. २ सलाऊद्दीन यास र.रु.१० लाख कर्ज मंजूर केले होते. त्यावेळी संस्थमध्ये उपलब्ध प्रकरणांमधील उतारे ग्रामपंचायतीकडे पडताळणीकरीता पाठविले होते. त्यावेळी ८अ चे उता–यावर कर्ज नसलेचे निष्पन्न झाले होते. आम्ही संस्थेचे प्रतिनीधी या नात्याने आम्ही मंजूर केलेल्या कर्जाचा बोजा विवादित मिळकतीच्या ८अ पत्रकी नोंदविणेकरिता पत्र संबंधित ग्रामपंचायतीकडे पाठविले होते. त्यावेळी आम्हास ग्रामपंचायतीकडुन समजले होते की, त्या उता–यावर बोजा नोंद नाही. त्यावेळी ८अ चा उतारा बनावट असलेचे आढळुन आले होते. त्यावेळी संस्थेमार्फत आम्ही तक्रार दिली होती. सदर कर्ज प्रकरणी आरोपी क्र. १ व आरोपी क्र.३ हे जामीनदार होते. मी आरोपी क्र.१ यास पाहिल्यास ओळखु शकतो. तो आज न्यायालयामध्ये हजर आहे. आरोपी क्र. २ यास मी ओळखत नाही.

**<u>सरतपास पुर्ण</u>.**
**<u>उलटतपास आरोपींतर्फे श्री.एस.एस.निकम यांचेमार्फत सुरु</u>**

२. हे म्हणणे खरे आहे की, दि.१०/१२/२००७ रोजी कराड शहर पोलीस ठाण्यातील पोलीसांनी माझ्या सांगणेप्रमाणे माझा जबाब नोंदविला आहे. सदर जबाब मी वाचुन पाहिला. सदर जबाब नोंदवितेवेळी मी पोलीसांना, त्यावेळी संस्थेमार्फत आम्ही तक्रार दिली होती, ही बाब सांगितली नव्हती. मी सुमारे ५ वर्षे कालावधीकरिता संबंधित पतसंस्थेमध्ये चेअरमन पदावर कार्यरत होतो. हे म्हणणे खरे आहे की, संबंधित

पतसंस्थेमध्ये कर्ज विभाग स्वतंत्र आहे. हे म्हणणे खरे आहे की, गरजू व्यक्तीस कर्ज मंजूर करणेपुर्वी कर्ज प्रकरणांतील कागदपत्रांची पाहणी व तपासणी करणे हे कर्ज विभागातील कर्मचा–यांचे काम आहे. हे म्हणणे खरे आहे की, गरजू व्यक्ती संबंधित पतसंस्थेच्या कर्ज विभागामध्ये कर्ज मागणी अर्ज, त्यासंदर्भात मालमत्तेचे उतारे व इतर आवश्यक ती कागदपत्रे सादर करतात, ते संबंधित संस्थेच्या चेअरमनकडे थेट येत नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत प्रकरणातील आरोपी क्र. १ ते३ यांचेपैकी कोणीही माझ्याकडे व्यक्तीशः विवादित कर्ज प्रकरणासंदर्भात आले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपी क्र. १ ते ३ यांना व्यक्तीशः ओळखत नाही. मी पोलींसाना जबाब देतेवेळी, संस्थेमध्ये उपलब्ध प्रकरणांमधील उतारे ग्रामपंचायतीकडे पडताळणीकरीता पाठविले होते, तसेच त्यावेळी ८अ चे उता–यावर कर्ज नसलेचे निष्पन्न झाले ही बाब सांगितली होती. सदर बाब पोलीस जबाबामध्ये नमुद नसुन ती का नमुद नाही याचे कारण मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलीसांना सदर बाब सांगितली नव्हती त्यामळे ती जबाबमध्ये नमुद नाही. हे म्हणणे खरे नाही की, विवादित उतारा बनावट असलेचे मला अगर संबंधित संस्थेच्या कर्मचा–यांना दिसुन आले नव्हते. मी पोलीसांना जबाब देतेवेळी विवादित ८अ चा उतारा बनावट असलेचे मला आढळुन आल्याचे सांगितले होते. सदर बाब पोलीस जबाबामध्ये नमुद नसुन ती का नमुद नाही याचे कारण मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलीसांना सदर बाब सांगितली नव्हती त्यामळे ती जबाबमध्ये नमुद नाही. हे म्हणणे खरे नाही की, विवादित कर्ज प्रकरणाची कागदपत्रे मी व्यक्तीशः पाहिली नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांना जबाब देतेवेळी संबंधित पतसंस्थेच्या कर्मचा–यांकडुन माहिती प्राप्त करुन त्याआधारे जबाब दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, मला विवादित कर्ज प्रकरणातील काही गोष्टींची माहिती नव्हती त्यामुळे कर्मचा–यांकडुन ती माहिती प्राप्त करुन जबाब दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, विवादित कर्ज प्रकरणामध्ये दाखल कागदपत्रांची मला व्यक्तीशः माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, पतसंस्थेमार्फत संबंधित ग्रामपंचायतीकडे विवादित उतारा पडताळणेसाठी कोणता कर्मचारी पत्र घेवुन गेला होता त्याचे नाव पोलीस जबाबामध्ये नमुद नाही. हे म्हणणे खरे आहे की, विवादित ८अ उतारा वैद्य आहे अगर बनावट आहे याची पडताळणी मी स्वतः संबंधित संस्थेच्या कार्यालयामध्ये बसुन केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासामध्ये नमुद मी संबंधित पतसंस्थेचा चेअरमन असताना प्रस्तुत प्रकरणांतील आरोपी क्र. २ सलाऊद्दीन यास र.रु.१० लाख कर्ज मंजूर केले होते, त्यावेळी संस्थमध्ये उपलब्ध प्रकरणांमधील उतारे ग्रामपंचायतीकडे पडताळणीकरीता पाठविले होते, त्यावेळी ८अ चे उता–यावर कर्ज नसलेचे निष्पन्न झाले होते, आम्ही संस्थेचे प्रतिनीधी या नात्याने आम्ही मंजूर केलेल्या कर्जाचा बोजा विवादित

मिळकतीच्या ८अ पत्रकी नोंदविणेकरिता पत्र संबंधित ग्रामपंचायतीकडे पाठविले होते, त्यावेळी आम्हास ग्रामपंचायतीकडुन समजले होते की, त्या उता–यावर बोजा नोंद नाही, त्यावेळी ८अ चा उतारा बनावट असलेचे आढळुन आले होते, त्यावेळी संस्थमार्फत आम्ही तक्रार दिली होती, सदर कर्ज प्रकरणी आरोपी क्र. १ व आरोपी क्र.३ हे जामीनदार होते, हे मी खोटे कथन केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत.

Digitally signed by UTPAT ATUL ARUN
Date: 2026.07.21 16:51:35 +0530

दि. २१/०७/२०२६.

(ए.ए. उत्पात)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कराड.
(कोर्ट क्र.०४)